# जपानमधील यावाटा येथून मेट्रो-३ चे रुळ मुंबईत दाखल

## आणखी २ संच वर्षाअखेर येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मार्गावर धावणाऱ्या मेट्रोचे रुळ मुंबईत दाखल झाले आहेत. मितसुई कंपनीने पाठवलेला हा रुळांचा संच जपानमधील यावाटा येथून ४ आठवड्यांच्या कालावधीत सागरी मार्गाने प्रवास करून मुंबईत आणण्यात आला.

३ हजार ६१५ मेट्रिक टन वजन असलेल्या हेड हार्डन प्रकारच्या रुळ यंत्रणेचे आगमन हे मुंबई मेट्रो ३च्या पूर्णत्वाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा समजला जातो.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मिळालेल्या माहितीनुसार, जपानमधील यावाटा येथून ही रुळ यंत्रणा उच्च प्रतीची आणि अत्यल्प कंपने देणारी हाय एटिन्यूएशन लो व्हायब्रेशन पद्धतीची आहे. भारतात ही यंत्रणा प्रथमच वापरण्यात येत आहे. मेट्रो धावत असताना कमीत कमी कंपने आणि ध्वनी निर्माण करणे हीदेखील या यंत्रणेची वैशिष्ट्ये आहेत.

सचिन लुंगसे



जपानमधून सागरी मार्गाने दाखल झालेले मेट्रोचे रुळ.

**मुंबईतील** प्राचीन वास्तू यांना इजा पोहोचणार नाही या दृष्टीनेही ही यंत्रणा उपयुक्त आहे. कोविडसंबंधी नेमून दिलेल्या नियमावलीनुसार हा रुळांचा संच मुंबई बंदरातून बीकेसी येथील एमएमआरसीच्या यार्डात काही दिवसांतच सुरक्षितपणे पोहोचेल.

### सुरक्षेच्या दृष्टीने परिपूर्ण

यंत्रणा इतर सामान्य यंत्रणांच्या तुलनेत २० ते २२ व्हीडीबी इतकी कंपन गती कमी करणारी आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने परिपूर्ण आहे. जलद आणि सुरक्षित प्रवास उपलब्ध करून देणाऱ्या मेट्रो ३च्या बांधकाम पूर्णत्वाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

**- रणजित सिंह देओल,**
व्यवस्थापकीय संचालक,
एमएमआरसी